वर्ष - 7 । अंक - 167 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

॥शुभ दसरा॥
सर्वांना विजयादशमी व दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा!

www.mahaenews.com । मंगळवार, दिनांक 24 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## केंद्र सरकारची मान्यता;

# निगडीपर्यंत मेट्रो विस्तार!

### » पिंपरी-चिंचवडकरांच्या मागणीला अखेर यश

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक प्रवासी वाहतूक सक्षम करण्याच्या हृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रो विस्ताराला केंद्र सरकारची मान्यता मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील नागरिकांच्या मागणीला अखेर यश मिळाले आहे.**

पिंपरी ते निगडी भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो विस्तारीकरणाच्या प्रस्तावाला केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाने सोमवारी २३ ऑक्टोबर मान्यता दिली. पहिल्या टप्प्यात पिंपरी ते दापोडी हा ७.९ किलोमीटरचा मार्ग १ ऑगस्ट २०२३ पासून सुरू झाला होता. तर, पिंपरी ते फुगेवाडी हा मार्ग ६ मार्च २०२२ पासून सुरू झाला आहे. या मार्गाच्या कामासोबत पिंपरी ते निगडी या ४.१३ किलोमीटर अंतराच्या मार्गाचे काम सुरू करावे, अशी शहरातील नागरिकांनी लावून धरली होती.

दरम्यान, राज्य सरकारने निगडीपर्यंतच्या मेट्रो मार्गाला मान्यता दिली. केंद्र सरकारकडे दोन वर्षांपासून प्रस्ताव रखडला होता. केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाचे उपसचिव सुनील कुमार यांनी निगडीपर्यंत मेट्रोला मान्यता दिल्याचे पत्र राज्य सरकारला पाठविले आहे. त्यामुळे निगडीपर्यंत मेट्रो धावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



### साडेबारा किलोमीटर मेट्रो प्रवास सुविधा...

**» पिंपरी ते निगडी विस्तारित मेट्रो मार्गावर चिंचवड स्टेशन येथील पिंपरी पोलीस ठाणे, आकुर्डीतील खंडोबा माळ चौक आणि निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक असे तीन स्टेशन आहेत. हा मार्ग ४.१३ किलोमीटर लांबीचा असून तो उन्नत (एलिव्हेटेड कॉरिडॉर) मार्ग असणार आहे. खर्चात केंद्र सरकार आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेचा समप्रमाणात वाटा असेल. त्यामुळे निगडी ते दापोडी या मुख्य मार्गावर १२.५० किलोमीटर अंतराची मेट्रो प्रवासी सेवा उपलब्ध होणार आहे.**



“ पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. त्यामुळे सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्था सक्षम करणे काळाची गरज आहे. स्वारगेट ते पिंपरी आणि पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रो हा पिंपरी-चिंचवड व पुणे शहराचा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पासाठी सकारात्मक पुढाकार घेतला. राज्यात आणि केंद्रात एकाच विचाराचे सरकार असल्यामुळे त्याला फायदा झाला. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात या प्रकल्पाला खो बसला होता. पिंपरी-चिंचवडकरांच्या हिताचा निर्णय घेतल्याबद्दल शहरवासीयांच्या वतीने केंद्र व राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.

**– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..**



“ पिंपरी ते निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो धावण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. निगडीपर्यंतच्या प्रस्तावाला केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाने मान्यता दिली. त्यामुळे शहरवासीयांचे निगडीपर्यंत मेट्रोचे स्वप्न पूर्ण होणार आहे. लोकनेते स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी वेळोवेळी मेट्रो विस्ताराबाबत पाठपुरावा केला होता. पहिल्या टप्प्यात पिंपरी ते दापोडी हा ७.९ किलोमीटरचा मार्ग १ ऑगस्ट २०२३ पासून सुरू झाला होता. तर, पिंपरी ते फुगेवाडी हा मार्ग ६ मार्च २०२२ पासून सुरू झाला आहे. या मार्गाच्या कामासोबत पिंपरी ते निगडी या ४.१३ किलोमीटर अंतराच्या मार्गाचे काम सुरू करावे, अशी नागरिकांची आग्रही मागणी होती. त्याला यश मिळाले.

**– शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा पिंपरी-चिंचवड

---

# आदित्य ठाकरे यांच्या हस्ते थेरगाव येथे देवीची आरती

### » ॲड. सचिन भोसले यांनी भक्ती-शक्ती शिल्पची प्रतिकृती देवून केले स्वागत

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेचे युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी सोमवारी थेरगाव येथील नवरात्र उत्सवास भेट देऊन देवीची आरती केली. यावेळी आदित्य ठाकरे आणि पुणे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार सचिन अहिर यांचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी भक्ती शक्ती शिल्पची प्रतिकृती देवून स्वागत केले.**



थेरगाव शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवा सेना प्रमुख, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी सोमवारी थेरगाव येथील नवरात्र उत्सवास भेट देऊन देवीची आरती केली. त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

ठाकरे, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सचिन अहिर यांचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी भक्ती शक्ती-शिल्पची प्रतिकृती देवून स्वागत केले.

थेरगाव - वाकड रोड येथील ॲड. सचिन भाऊ भोसले युवा मंच, न्यू आझाद युवक संघ, जिजाऊ महिला संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हभप जयश्री येवले या गायनाचार्य हभप शंकर महाराज इंगोले आणि लक्ष्मण महाराज पांचाळ यांचे कीर्तन झाले.

### शहर पदाधिकाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती...

**» ॲड. सचिन भोसले यांच्या कार्यालयासमोर ठाकरे यांच्या वाहनावर ढोल ताशाच्या गजरात, फटाके फोडून जेसीबी मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, जिल्हा संघटक सुलभा उबाळे, माजी शहर प्रमुख योगेश बाबर, महिला शहर प्रमुख अनिता तुतारे, माजी नगरसेवक अनंत कोऱ्हाळे आदींसह शहर कार्यकारिणीचे सदस्य व प्रमुख पदाधिकारी बहुसंख्य शिवसैनिक उपस्थित होते.**

# दादांपाठोपाठ आता ताई झेडपीमध्ये!

## » जि.प.च्या कामांचा आढावा, अधिकाऱ्यांना सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पालकमंत्री झाल्यानंतर दोन दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे शहरासह जिल्हा परिषदेतील कामांचा आढावा घेताना शिक्षण, बांधकाम विभागांची झाडाझडती घेतली. त्यानंतर दोन दिवसांनी आता बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी कार्यकर्त्यांसह जिल्हा परिषदेत कामांचा आढावा घेत सूचना केल्या.**

काही दिवसांपूर्वी पुण्यात एका जाहीर कार्यक्रमात, पुण्याचे कारभारी बदलले आहेत. आता पुण्यात लक्ष घालणार आहेत, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले होते. त्याबाबत पालकमंत्री अजित पवार यांना विचारता त्यांनी त्याबाबत फारसे बोलणे टाळले. त्याच दिवशी शुक्रवारी अजित पवार यांनी जिल्हा परिषदेत देऊन आपल्या स्टाइलने कामांचा आढावा घेतला. अजितदादा पालकमंत्री झाल्यानंतर पुण्यात सक्रिय झाले आहे. त्या पाठोपाठ खासदार सुप्रिया सुळे या ॲक्शन मोडमध्ये आल्या आहेत. त्यांनी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुप्रिया सुळे यांची सोमवारी भेट दिली. त्यावेळी विविध कामांचा आढावाही त्यांनी घेतला. एकाच ग्रामसेवकाकडे तीन-चार ग्रामपंचायतींचा कार्यभार असल्याने नागरिकांची कामे ठप्प होत आहेत. तसेच बारामती लोकसभा मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक



कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. तसेच औषध पुरवठ्याचा आढावा घ्यावा, अशी मागणी सुळे यांनी केली. अंगणवाड्यामध्ये पाणी, वीज, स्वच्छता गृहांची सुविधा योग्यरित्या उपलब्ध करावी. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती धोकादायक झाल्या आहेत.

त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात यावी. तसेच मुलींच्या जन्म दरचा अहवाल वेळोवेळी तयार करावा. वैयक्तिक लाभांच्या योजना, लाभार्थ्यांचा अहवाल तयार करून माहिती उपलब्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली.

जिल्हा नियोजन समितीतंर्गत मंजूर कामांची सद्यस्थिती माहिती उपलब्ध व्हावी. कामे तातडीने पूर्ण होण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही लवकरात लवकर व्हावी, अशीही मागणी केली. मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण यांनी त्यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. खासदार सुप्रिया सुळे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातील रस्त्यांबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. त्यावेळी प्रकल्प संचालक संजय कदम यांनी या ठिकाणच्या रस्त्यांची माहिती दिली. बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात चिंताजनक आहेत. त्यामुळे रस्ते सुरक्षिततेला प्राधान्य देण्याकडे लक्ष वेधण्यात आले. मतदारसंघातील प्रत्येक महामार्ग हा 'झिरो ॲक्सिडेंट झोन' करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी महामार्ग प्राधिकरण तसेच विविध सामाजिक संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. नवले पुल परिसरातील अपघात कमी करण्यासाठी आणखी उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी लवकरच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे तज्ज्ञ नवले पुलाची पाहणी करणार आहेत. तसेच कात्रज चौकातील पूर आणि फुरसुंगे ते सासवड या मार्गातील रस्त्यांचा आढावा सुळे यांनी घेतला.

### शाळांच्या इमारती धोकादायक

» एकाच ग्रामसेवकाकडे तीन-चार ग्रामपंचायतींचा कार्यभार असल्याने नागरिकांची कामे ठप्प होत आहेत. तसेच बारामती लोकसभा मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. तसेच औषध पुरवठाचा आढावा घ्यावा, अशी मागणी सुळे यांनी केली. अंगणवाड्यामध्ये पाणी, वीज, स्वच्छता गृहांची सुविधा योग्यरित्या उपलब्ध करावी. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती धोकादायक झाल्या आहेत. त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात यावी. तसेच मुलींच्या जन्म दरचा अहवाल वेळोवेळी तयार करावा. वैयक्तिक लाभांच्या योजना, लाभार्थ्यांचा अहवाल तयार करून माहिती उपलब्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# लोकांना वाटले की मी रडत बसेन!

## » माझ्यावर दोन वेळा शाई फेकली : चंद्रकांत पाटील

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मी चळवळीतून आलेला कार्यकर्ता आहे. तुमचे विषय मार्गी लावावे, असे वाटत असेल, तर मोर्चे काढा. तुम्ही आरडाओरडा केल्यावर, आम्हालाही आढावा बैठका लावता येतात', असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील महिला प्राध्यापकांना केले आहे. 'माझ्यावर शाई फेकतात, पण मी शर्ट बदलून बाहेर पडतो. बिचारे ते निराश होतात. दोनवेळा शाई फेकण्यात आली. लोकांना वाटले की, मी घाबरून बंद खोलीत रडत बसेन. पण, मी शर्ट बदलून तिसऱ्या मिनिटांला बाहेर पडतो', असेही पाटील यांनी सांगितले.**



### बोलतो काय...मीडियात येत काय ?

» मी इथे बोलत असताना, मला जाणीव आहे की, काही पत्रकार दृश्य आणि अदृश्य स्वरूपात येथे उपस्थित असतील. त्यामुळे ते आता छापतील की, विद्यार्थिनींना स्कूटी देण्याचा निर्णय झाला. मी माईकमधून काय बोलतो आणि मीडियात काय बाहेर पडत, यामध्ये फारच फरक पडत आहे. त्यामुळे मी म्हणतो की, तुमच्या माईकमध्ये काहीतरी प्रॉब्लेम झाला आहे. यालाही मी घाबरतही नाही, असे पाटील यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या वतीने आयोजित महिला सक्षमीकरण परिषदेत पाटील बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते. पाटील म्हणाले की, दिवसभर चालणाऱ्या या परिषदेत काही मागण्या अशा निर्माण करा की, त्या चर्चेद्वारे पूर्ण होतील.

शालेय विद्यार्थिनींना आपण एसटी बसचा पास दिला आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थिनींना एसटी बसचा पास देता येईल का, याबाबतही चर्चा करता येईल. शालेय विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी आपण सायकली दिल्या आहेत. विद्यार्थिनींना घरापासून महाविद्यालयाचे अंतर दूर पडत असल्याने, ओडिशा सरकारने त्यांना स्कूटी देण्याचा निर्णय घेतला. तसाच प्रयोग आपल्याकडे करता येईल, याबाबतची विचार सुरू असल्याचे पाटील यांनी सांगितले.

# पुण्यात थंडीची चाहुल

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या काही दिवसांपासून शहरातील किमान तापमानात झालेली वाढ आता हळूहळू कमी होऊ लागली आहे. त्यामुळे शहरात थंडीची चाहुल लागली असून पुढील दोन दिवसांत किमान तापमानात अजून काहीशी घट होण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली. परिणामी, 'ऑक्टोबर हिट'चा चटका कमी होऊन गारठा काहीसा वाढू शकतो. पावसाने उघडीप देताच शहरात कोरड्या हवामानाची स्थिती पाहायला मिळाली. यातच गेल्या आठवडाभरापासून किमान तापमानातही वाढ होत होती. सरासरीपेक्षा किमान तापमानात ३ अंशांनी वाढ झाल्याचे दिसून आले. त्यामुळे किमान तापमान हे साधारणपणे २० अंशांच्या पुढे नोंदले जात होते.



दरम्यान सोमवारी (ता. २३) शहरात १८.२ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. यंदा ऑक्टोबरमधील हे आतापर्यंतचे सर्वाधिक कमी किमान तापमान ठरले. आतापर्यंत ऑक्टोबरमध्ये शहरात १९ अंशांपर्यंतच्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. मात्र, बहुतांश वेळा किमान तापमान हे २० अंशांपुढेच कायम होते. अंशतः ढगाळ वातावरणामुळे किमान तापमानात वाढ झाली होती. रविवारी (ता. २२) तर चक्क किमान तापमानात ४ अंशांनी वाढ झाल्याचे दिसून आले. त्यात कमाल तापमानातही चढ-उतार सुरू असून उन्हाच्या झळा आणि उकाड्याची अनुभूती पुणेकरांना होत होती.

# 'घरकुल' ची विक्री करू नका!

## अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप: योजनेच्या माध्यमातून लाभार्थिंचे स्वप्न

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**घरकुलच्या माध्यमातून नागरिकांचे घराचे स्वप्न साकार होत असून लाभार्थींच्या जीवनात यामुळे मोठा बदल होणार आहे. या घरांमध्ये येणारी पिढी तयार होणार असून, त्यांना चांगले आयुष्य लाभेल असं काम करा. तसेच या सदनिकांचा योग्य पद्धतीने वापर करा, आपल्या सदनिकेची स्वच्छता ठेवावी व मिळालेली सदनिका भाड्याने देऊ नये अथवा विक्री करू नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले तसेच लाभार्थींचे पुढील आयुष्य सुख समृद्धीचे, भरभराटीचे जावो अशा शुभेच्छाही दिल्या.**



केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने लिंकरोड पत्राशेड येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असून या प्रकल्पातील इ इमारतीतील एकूण १११ लाभार्थ्यांच्या सदनिकांची संगणकीकृत सोडत प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृह येथे काढण्यात आली. या कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी उज्वला गोडसे, कार्यकारी अभियंता अनघा पाठक, कार्यालय अधिक्षक विष्णू भाट यांच्यासह झोनिपू विभागातील कर्मचारी आणि लाभार्थी उपस्थित होते. यावेळी नियोजित घरकुल सहकारी गृहरचना संस्थेसाठी तात्पुरत्या स्वरुपात निवड करण्यात आलेल्या सोसायटी अध्यक्षांचा अतिरिक्त आयुक्त जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी लाभार्थींनी आता हक्काचे व स्वतःचे घर मिळाल्याने इमारतीमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण करावे, घराचा वापर स्वतः करावा, इमारती भोवती झाडे लावून योग्य प्रकारे निगा राखावी व जतन करावे आणि विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर गृहप्रवेश करावा. तसेच महापालिका नागरिकांना सुसज्ज सुविधा देण्यासाठी नेहमीच कार्यरत असते असेही अतिरिक्त आयुक्त जगताप म्हणाले.

### अनेक वर्षांच्या तपस्येचे फळ

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे यांनी प्रकल्पाची माहिती दिली तसेच अनेक वर्षांच्या तपस्येचे फळ लाभार्थींना मिळत असून लाभार्थींनी सदनिकांचा वापर योग्य रितीने करावा असे आवाहन केले. तसेच झोपडीपासून इमारतीपर्यंतचा प्रवास तुम्ही केला आहे त्यामुळे हा जीवनातला खुप मोठा बदल आहे. तुमची येणारी पिढी या घरात राहणार आहे त्यामुळे तुमच्यातही बदल होणे गरजेचे आहे असेही बोदडे यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार विष्णू भाट यांनी मानले. यावेळी लाभार्थ्यांनीही आपल्या मनातील भावना उपस्थितांसमोर बोलून दाखवल्या.

---

# कसबा मतदारसंघ: मोफत आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद

## हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून आयोजित आरोग्य शिबिराचा हजारो नागरिकांना लाभ

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कसबा विधानसभा मतदारसंघात पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाकडून आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात जवळपास ४८०० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. गेली दहा दिवसांपासून मतदारसंघात समाविष्ट सर्व प्रभागांमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नवरात्रीचा सण सुरु असताना देखील मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवत आपली आरोग्य तपासणी करून घेतली.**



पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री मा.श्री. चंद्रकांतदादा पाटील व समर्थ युवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तातील साखर (ब्लड शुगर), रक्तदाब (बी.पी.), छातीचा एक्स-रे, रक्त तपासणी (सीबीसी टेस्ट), कोलेस्ट्रॉल तपासणी, स्तनाचा कर्करोग तपासणी (मॅमोग्राफी) आदी तब्बल ९५०० रुपये पर्यंतच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या. कसबा मतदारसंघात असणाऱ्या सर्व सहा प्रभागांमध्ये विविध ठिकाणी नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आज यशस्वी समारोप करण्यात आला.

यावेळी बोलताना हेमंत रासने म्हणाले, "आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आपण आरोग्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष करतो, परंतु कालांतराने याचे गंभीर परिणाम आपल्यासह कुटुंबाला सहन करावे लागतात. त्यामुळे योग्य वेळी आरोग्य तपासणी करून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशातील नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे, त्यांना योग्य ते उपचार मिळवण्यासाठी अनेक योजना राबवल्या असून हाच विचार पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांची विविध आजाराची मोफत तपासणी करण्यात आली असून त्यांना काही आजार असल्यास पुढील उपचारासाठी मार्गदर्शन व सर्वतोपरी मदत केली जाणार आहे. शिबिरासाठी परिश्रम घेणारे सर्व डॉक्टर्स, इतर कर्मचारी, भाजपाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनापासून धन्यवाद".

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी कसबा मतदारसंघाचे अध्यक्ष राजेंद्र काकडे,सरचिटणीस छगन बुलाखे, सहसंयोजक वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेश अनिल बेलकर, राणी ताई कांबळे,नगरसेवक योगेश समेळ, गायत्री खडके, राजेश येनपूरे, अजय खेडेकर, विजयालक्ष्मी हरिहर, मनीषाताई लडकत, सम्राट थोरात, सौ. आरती कोंढरे, बापू मानकर, सौ. स्वरदा बापट, सौ. सुलोचना कोंढरे, नामदेव माळवदे, प्रमोद कोंढरे, सौ.रेश्मा सय्यद, तुषार पाटील, उदय लेले, सुनिल खंडाळे, अर्चना पाटील, शहर कार्यालय मंत्री संजयमामा देशमुख, युवा मोर्चा अध्यक्ष अमित कंक, प्रभाग अध्यक्ष किरण जगदाळे, संदिप इंगळे, सागर शिंदे, रमेश जगताप, उमेश दुंडे तसेच विष्णू अप्पा हरिहर, चंद्रकांत पोटे, जयदिप शिंदे, निलेश कदम, राजू परदेशी, बाप्पू नाईक, सनी पवार, माधव साळुंखे, संकेत थोपटे, परेश मेहेंदळे, बिपीन बोरावके, तांबोळीताई माधुरी सकपाळ, अर्जुन खानापुरे, प्रदीप रणदिवे, सचिन ससाणे, दिपाली मारटकर, उमेश अण्णा चव्हाण, प्रणव गंजीवाले, तुषार रायकर, निर्मल हरिहर, राहुल हरिहर, संतोष फडताळे, यतिश रासने आदींनी परिश्रम घेतले.

> "दररोजच्या कामातून वेळ काढून आरोग्य तपासणी करणे शक्य होत नाही. एक तपासणी करायची म्हंटले तरी हजारो रुपये लागतात, त्यामुळे देखील आजवर कधी आवर्जून आरोग्य तपासणी केली नाही. श्री. हेमंतभाऊ रासने यांनी आमच्या घराजवळच या शिबीरचे आयोजन केल्याने सर्व चाचण्या करून घेतल्या. माझ्यासह आमच्या कुटुंबातील सर्वांची येथे तपासणी करण्यात आली, याबद्दल हेमंतभाऊंचे आभार"
>
> **- स्थानिक नागरिक**

> "माझ्या सारख्या रिक्षावाल्याला साधं दवाखान्यात जाऊन शंभर -दोनशे रुपयांची बीपी आणि शुगर चेक करायला सुद्धा परवडत नाही. एक्स-रे वगैरे तर लांबची गोष्ट आहे. पण आज हेमंत भाऊ रासने यांनी आमच्या सारख्या गरिबांसाठी ही मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून दिल्याबद्दल खरंच मनापासून त्यांचा आभार मानतो. हेमंत भाऊ नेहमीच आमच्या अडीअडचणीत सोबत असतात.
>
> **-रिक्षा चालक**

# आता 'इंडिया'चे काय होणार?




**मध्य प्रदेशमधील काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या भांडणात विरोधकांच्या 'इंडिया'चे काय होणार असा प्रश्न या महाआघाडीतील घटक पक्षांना पडू लागला आहे. 'इंडिया'च्या घटक पक्षांतील मतभेदांमुळे भाजपला आनंदाच्या उकळ्या फुटू शकतात. घटक पक्ष म्हणतात की, काँग्रेसने मोठ्या मनाने सगळ्यांना सामावून घेतले पाहिजे.**

तर काँग्रेसचे म्हणणे आहे की, मध्य प्रदेशमधील एक-एक जागा महत्त्वाची आहे. काँग्रेसला अनुकूल परिस्थिती असेल तर 'सप'ला जागा द्यायच्या कशाला? भाजपला हरवण्याची संधी चालून आली असेल तर त्यात इतर पक्षांना वाटेकरी कशाला करायचे, असा विचार काँग्रेसने केलेला दिसतो. म्हणूनच काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे दावेकरी कमलनाथ यांनी, 'कोण ते अखिलेश-वखिलेश?', असे विधान करून 'सप'चे प्रमुख अखिलेश यादव यांच्या आरोपांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असावे. त्यावर, काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न केल्यामुळे कमलनाथ यांना दिल्लीकरांचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट झाले आहे. काँग्रेसच्या या अरेरावीमुळे 'इंडिया'तील घटक पक्ष काहीसे नाराज झालेले आहेत. समाजवादी पक्षाचे म्हणणे होते की, भाजपला पराभूत करण्यासाठी 'इंडिया'ची स्थापना झाली असेल तर, ही




महाआघाडी राज्यांमध्येही झाली पाहिजे. मध्य प्रदेशमध्ये जिथे 'सप'चे उमेदवार जिंकण्याची शक्यता असतील अशा पाच-सहा जागा आम्हाला द्या. बाकी तुम्ही लढवा! पण, काँग्रेसने 'सप'चे ऐकलेले नाही. उत्तर प्रदेशमध्ये 'सप'ने जशास तसे वागायचे ठरवले तर काँग्रेस काय करणार, असे विचारले जाऊ शकते.

'इंडिया'च्या मुंबईतील बैठकीनंतर प्रामुख्याने काँग्रेसचे लक्ष पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीकडे केंद्रित झाले आहे. राहुल गांधींच्या 'भारत जोडो' यात्रेला मिळालेल्या प्रतिसादानंतर आणि कर्नाटकच्या विजयानंतर मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा या चारही मोठ्या राज्यांमध्ये काँग्रेसला यशाची खात्री वाटू लागली आहे. मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये सत्ता मिळू शकेल, राजस्थानमध्ये तुल्यबळ लढाई होईल, असे राहुल गांधींनी एका जाहीर कार्यक्रमामध्ये सांगितले होते. तेलंगणामध्ये रेवंत रेड्डी यांच्याकडे सर्वाधिकार दिल्यानंतर काँग्रेसने राज्यातील वातावरण बदलून टाकल्याचे सांगितले जाते. आत्ता-आत्तापर्यंत काँग्रेसमधून नेते भारत राष्ट्र समिती (बीआरएस) वा भाजपमध्ये जात होते. आता 'बीआरएस'मधून नेते काँग्रेसमध्ये येऊ लागले आहेत. भाजपने कितीही गाजावाजा केला तरी तेलंगणामध्ये त्यांची डाळ शिजण्याची शक्यता नाही असे विश्लेषकांचे म्हणणे आहे. इथे लढाई 'बीआरएस' आणि काँग्रेस यांच्यामध्ये होणार असून लोकांच्या नाराजीचा काँग्रेसला मोठा लाभ मिळेल असे पक्षाला वाटते. मिझोरमसह पाचही राज्यांमध्ये सत्ता मिळण्याची आशा काँग्रेसला वाटू लागल्याने काँग्रेसचे 'इंडिया'कडे दुर्लक्ष झालेले आहे. या राज्यांमध्ये काँग्रेसने चांगली कामगिरी केली वा त्यांची सत्ता स्थापन झाली तर आगामी लोकसभा निवडणुकीतही यश मिळेल असा विचार काँग्रेस करत आहे. त्यांच्या या राजकीय मांडणीमध्ये तथ्यही असू शकते. गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड या राज्यांमध्ये काँग्रेसला भाजपशी लढावे लागेल. उत्तरेतील सुमारे २०० लोकसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेस विरुद्ध भाजप अशी थेट लढाई होणार आहे. या जागांवर काँग्रेसला अधिकाधिक जागांवर भाजपचा पराभव करता आला तर केंद्रातील सत्तेचे गणित पूर्णपणे बदलू शकते.

या दोनशे जागांवर काँग्रेसला 'इंडिया'च्या घटक पक्षांची फारशी गरज नाही. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसचा समावेश आहे, तिथे जागावाटपाची चर्चा सुरू आहे. गुजरातमध्ये काँग्रेसला कदाचित आम आदमी पक्षाची मदत लागू शकते. तिथल्या विधानसभेत 'आप'ने काँग्रेसचे नुकसान केले होते. मतविभागणी टाळायची असेल तर काँग्रेस व 'आप'ला गुजरातमध्ये तडजोड करावी लागेल. इथे काँग्रेसने सामंजस्याची भूमिका घेतली तर 'आप'ही दिल्लीत काँग्रेसला सातपैकी दोन वा तीन जागा देऊ शकतो. पंजाबमध्ये हे दोन्ही पक्ष एकमेकांविरोधातच लढतील. दक्षिणेत केरळ व पश्चिम बंगालमध्ये 'इंडिया'तील घटक पक्षांमध्ये आघाडी होणार नाही.

## संपादकीय »

### महुआ-मायेचे मूळ!

***लोकसभेचे अधिवेशन सुरू असते तेव्हा प्रत्येक खासदारास दररोज लोकसभेत पाच तर राज्यसभेत सात प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो.***

तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोइत्रा यांनी लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी लाच घेतली असा आरोप झाल्यापासून, भ्रष्टाचाराचा मूलभूत तिटकारा असलेल्या भाजपने त्याची लगेच दखल घेतल्यापासून आणि लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी याप्रकरणी लगोलग चौकशी करण्याचा रास्त निर्णय घेतल्यापासून एक विचित्र परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते. या परिस्थितीत विचित्र काय यावर भाष्य करण्याआधी मुळात ही परिस्थिती काय हे लक्षात घेणे योग्य. लोकसभेचे अधिवेशन सुरू असते तेव्हा प्रत्येक खासदारास दररोज लोकसभेत पाच तर राज्यसभेत सात प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. परंतु हे प्रश्न लिखित वा ईमेल स्वरूपात १५ दिवस आगाऊ दाखल करावे लागतात. नंतर त्यांची विषयवार वर्गवारी होते आणि लॉटरी पद्धतीने एकूण आलेल्या प्रश्नांतील २० प्रश्न संबंधित मंत्र्याने उत्तर देण्यासाठी निवडले जातात. हे प्रश्न 'तारांकित' मानले जातात.

**करोनाच्या लशीने पुरुषत्व जातं", "घाईघाईत बनवलेली लस! ती घेऊनच करोना होतो!", "गोंद्याने लस घेतली आणि त्याच्या अंगावरून वारं गेलं."- ही विधानं फार तर दोन-अडीच वर्षांपूर्वीची. जगभरात थैमान घालणाऱ्या कोविडशी लढायला शास्त्रज्ञांनी शर्थीच्या प्रयत्नांनी लस बनवली. तिच्याबद्दल नको नको त्या वावड्या उठल्या. सुशिक्षितांनाही भयाने पछाडलं मग अशिक्षितांची काय कथा?**

# लस नाकारण्याची साथ..!

पूर्वीपासून लस या प्रकाराबद्दलच जगाच्या सामाजिक मानसिकतेत मोठा भयगंड जोपासलेला आहे. खरं तर देवीचा आजार टाळायचा लस हा उपाय २२०० वर्षांपूर्वीपासून आशियात-आफ्रिकेत होता. आजाऱ्याच्या फोडांतली लस टोचली की सौम्य आजार होतो आणि जीवघेणं दुखणं टळतं हे त्या काळातही माहीत होतं. त्या जिवंत लशीला कसलंही नियमन नव्हतं. जादा लस टोचली गेली तर खराखुरा देवीचा आजार होऊन मरणही येत होतं. पण तो स्वेच्छेचा मामला असल्यामुळे त्याला विरोधही नव्हता.

उलट उस्मानी साम्राज्यातली तशी लस आपल्या मुलांना टोचून घ्यायचा हट्ट धरून लेडी मॉंटेग्यूने ती लस १७२१मध्ये युरोपात नेली आणि रुळवली. मग १७९६मध्ये देवीची विज्ञानसिद्ध लस आली. तेव्हाही, 'ती लस टोचल्यावर माणसाचं गायीत रूपांतर होतं,' अशी आवई उठली होती. प्राण्यांच्या घाणेरड्या फोडांतल्या पुवाने



आपलं शरीर विटाळणं अनेकांना पसंत नव्हतं. अठरा-एकोणिसाव्या शतकात औद्योगिक क्रांतीनंतर कारखान्यांतले कामगार दाटीवाटीनं राहू लागले. साथी फैलावल्या. १८५३मध्ये ब्रिटिश सरकारने देवीचं लसीकरण सक्तीचं केलं तेव्हा 'आमच्या शरीरात दुसऱ्यांची ढवळाढवळ नको,' म्हणत लसविरोधी सेना उभ्या ठाकल्या. लाखांच्या जमावाने तान्ह्या बाळाच्या शवपेटिकेसह मोर्चा काढला. लसविरोधक चळवळ संपूर्ण युरोपात पसरली. १९०२मध्ये अमेरिकेत एका माणसाने 'लस घेणार नाही,' म्हणून बंड पुकारलं. 'कुणा एकाला आपल्या मर्जीने अनेकांचं आरोग्य धोक्यात आणायचा हक्क नाही,' अशा तत्त्वानुसार सरकारने त्याला कोर्टात खेचलं आणि खटला जिंकला. १९५४मध्ये पोलिओची लस आली. पंचावन्न साली लशीमध्ये चुकून जिवंत दमदार व्हायरस राहून गेला. त्याने साथच फैलावली. पण पोलिओच्या अपंगत्वाने हैराण झालेल्या आईबापांना लस हवीच होती. त्यांनी चूक पदरात घेतली. लसीकरण बिनबोभाट चालू राहिलं. नंतर गोवर-गालगुंडांची लस आली. ते आजार लोकांच्या मते सौम्य होते. म्हणून लसविरोधी मोहीम निघाली. घटसर्प-डांग्याखोकला-धनुर्वाताची लस निघाली तेव्हा तर 'डांग्या खोकल्याच्या लशीने मेंदूवर परिणाम होतो, स्वमग्नता येते, आकडी येते' असा बोभाटाच झाला. समाजमाध्यमांनी लोकांची समजूत घालायची सोडून तशा भयानक दुष्परिणामांच्या हृदयद्रावक कहाण्यांचा गदारोळ उठवला. अनेक आईबाप कोर्टात धावले. त्यांना वैज्ञानिक पाठबळ द्यायला त्यांच्याकडून लाच घेऊन एका तालेवार शास्त्रज्ञाने लॅन्सेट या मातबर मासिकात खोटा शोधनिबंध लिहिला!

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदेंच्या धनुष्यातून बाण सुटणार!

## » शिंदे गटाचा दसरा मेळावा आझाद मैदानावर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या दोन्ही गटांचा आज दसरा मेळावा पार पडत आहे. ठाकरे गटाचा मेळावा हा शिवाजी पार्कवर होणार आहे तर शिंदे गटाचा मेळावा आझाद मैदानावर पार पडणार आहे. दरम्यान, ठाकरे गटाचा हा दसरा मेळवा नाही तर शिमगा मेळावा आहे, ते त्यातून नुसता इतरांच्या नावाने शिमगा करणार अशी टीका राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (EKNATH SHINDE) यांनी केली आहे.**

दरम्यान पक्षाचं नाव आणि चिन्ह मिळाल्यानंतर शिंदे गटाचा हा पहिलाच मेळावा असून त्यांच्या



धनुष्यातून कोणता बाण सुटणार याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे. गेल्या वर्षी म्हणजे 2022 मध्ये शिवसेनेमध्ये दोन गट पडले आणि शिंदे गटाने वेगळा सवतासुभा मांडला. एकनाथ शिंदे यांनी निवडणूक आयोगामध्ये पक्ष आणि चिन्हाचा वाद जिंकला आणि शिवसेना हा पक्ष आपलाच असल्याचं सिद्ध केलं.

त्यानंतरचा हा पहिलाच दसरा मेळावा आहे. त्यामुळे शिंदे यांच्या बाणाला अधिक धार आली आहे यात काही शंका नाही. तसेच लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका या पुढील वर्षी होणार असून त्या पूर्वीचा हा मेळावा आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे राज्यातील आपल्या कार्यकर्त्यांना आणि साथीदारांना कोणता संदेश देणार याचीही उत्सुकता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी सातत्याने एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर गद्दार असल्याचं सांगत टीका केली आहे. त्याला सडेतोड उत्तर आज एकनाथ शिंदे देण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांनी नुकतंच समाजवादी परिवाराशी आघाडी केली आहे. तसेच त्यांच्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबतच्या युतीवरून आज एकनाथ शिंदे त्यांचा समाचार घेण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरे यांचे हिंदुत्व कसे बोगस आहे आणि आपणच कसे बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांचे पाईक आहोत हे ठासवण्याचा प्रयत्न एकनाथ शिंदे करतील.

नरेंद्र मोदी हे केवळ भारतात नव्हे तर जगभरात त्यांच्या कार्याने ओळखले जात असून त्याचे करावे तितके कौतुक कमीच आहे असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आधीही सांगितलं आहे. मोदींनी गेल्या 9 वर्षांमध्ये केलेली कामं, लोकोपयोगी योजना आणि जागतिक स्तरावर त्यांनी घेतलेली कणखर भूमिका याची उजळणी आज एकनाथ शिंदे पुन्हा एकदा करण्याची शक्यता आहे.

राज्यात सध्या मराठा आरक्षणाचा विषय तापत आहे. मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला मराठा आरक्षणासाठी दिलेली मुदत संपणार आहे. त्यामुळे आजच्या मेळाव्याच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मराठा आरक्षणावर आपली भूमिका मांडण्याची शक्यता आहे. यंदाचा दसरा मेळावा हा लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होणार आहे. पुढच्या वर्षाच्या सुरुवातील या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे यंदाचा दसरा मेळावा हा राज्य सरकारची विकासविषयक कामं जनतेसमोर मांडण्यासाठी उत्तम व्यासपीठ असेल. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे आज राज्य सरकारने केलेली कामं जनतेसमोर मांडतील.

### मराठा आरक्षणावर भूमिका

» राज्यात सध्या मराठा आरक्षणाचा विषय तापत आहे. मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला मराठा आरक्षणासाठी दिलेली मुदत संपणार आहे. त्यामुळे आजच्या मेळाव्याच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मराठा आरक्षणावर आपली भूमिका मांडण्याची शक्यता आहे. नरेंद्र मोदी हे केवळ भारतात नव्हे तर जगभरात त्यांच्या कार्याने ओळखले जात असून त्याचे करावे तितके कौतुक कमीच आहे असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आधीही सांगितलं आहे. मोदींनी गेल्या 9 वर्षांमध्ये केलेली कामं, लोकोपयोगी योजना आणि जागतिक स्तरावर त्यांनी घेतलेली कणखर भूमिका याची उजळणी आज एकनाथ शिंदे पुन्हा एकदा करण्याची शक्यता आहे.

# आरक्षणासाठी आत्महत्येचं सत्र सुरूच!

## » परभणीत आणखी एका तरूणाची आत्महत्या

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाचा विषय राज्यभर पेटला असताना आता त्या मागणीसाठी आत्महत्या करणाऱ्यांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. मराठ्यांना आरक्षण मिळावं यासाठी परभणीच्या पाथरी तालुक्यातील वडी येथे 28 वर्षे तरुणाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली आहे.**



त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून हा विषय आता वेगळं स्वरूप धारण करतोय की काय अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. परभणीच्या पाथरी तालुक्यातील वडी येथील रहिवाशी असलेला सोमेश्वर उत्तमराव शिंदे हा 28 वर्षे तरुण सालगड्याचे काम करत होता. घरी हलाखीची परिस्थिती होती. त्यातच आज दुपारी त्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. यानंतर त्याच्या मोबाईलच्या कव्हरमध्ये एक चिठ्ठी सापडली. त्या चिठ्ठीत मराठा समाजाला आरक्षण मिळावं असं त्याने म्हटलं आहे. तसेच सततच्या नापिकीमुळे आत्महत्या केल्याचा मजकूर त्याने चिठ्ठीत लिहून ठेवलेला होता. घटना कळताच मोठ्या प्रमाणावर मराठा समाजातील विविध संघटनेचे पदाधिकारी तसेच समाज बांधव घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी गेल्या 24 तासांमध्ये तीन तरूणांनी आत्महत्या केल्याचं समोर आलं आहे. नांदेडमध्ये आणखी एका तरुणाने आरक्षणसाठी आत्महत्येचं पाऊल उचललं आहे. तरुणाच्या मृतदेहाशेजारी सुसाईड नोटही सापडली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने मी विहिरीत उडी मारून जीव देत आहे, असा उल्लेख चिठ्ठीमध्ये उल्लेख केला आहे. मराठा आरक्षणासाठी आणखी एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली असल्याचा आरोप मराठा संघटनेच्यावतीने करण्यात आला आहे. भोपाळ (ता.नायगाव) येथील ओमकार आनंदराव बावणे (16) असे या विद्यार्थ्याचे नाव आहे.

# प्या बिअर आणि करा सरकारला चिअर..!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्यातील बिअर विक्रीत घट झाल्याची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक समिती स्थापन केली आहे. बिअरच्या वापराला चालना देण्यासाठी शिंदे फडणवीस सरकार उत्पादन शुल्कात कपात करण्याचा विचार करत आहे. बिअरच्या कमी झालेल्या खपामुळे उत्पन्नात घट झाल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाने ही समिती स्थापन केली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या नेतृत्वाखाली पाच सदस्य असलेल्या या समितीला इतर राज्यांच्या बिअर धोरणांचे परीक्षण करण्याचे काम देण्यात आले आहे. या समितीला महिनाभरात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बिअरच्या विक्रीत घट होण्यामागे उत्पादन शुल्क वाढीमुळे कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे सरकारच्या महसुलात घट झाली आहे. विदेशी आणि देशी दारूमध्ये अल्कोहोलचे प्रमाण बिअरपेक्षा जास्त आहे. अल्कोहोलच्या वापरावर आधारित तुलना केल्यास, बिअरवरील अबकारी शुल्काचा दर मद्याच्या तुलनेत जास्त असतो. बिअरच्या किमतीत घट झाल्याने ग्राहकांच्या मागणीत घट झाली आहे. बिअर उद्योगाने आपली आव्हाने एका प्रतिनिधीच्या माध्यमातून सरकारसमोर मांडली आहेत. बिअरवरील उत्पादन शुल्क दर कमी करून इतर राज्यांच्या महसुलात वाढ झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# मुंगेरी लाल के हसीन सपने!

## भावी पंतप्रधान उल्लेख; अखिलेशची भाजपावर टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशच्या लखनऊ मधील समाजवादी पक्षाच्या मुख्यालयाच्या बाहेर झळकलेल्या एका जुन्या बॅनरचा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. या बॅनरवर अखिलेश यादव यांचा भावी पंतप्रधान असा उल्लेख करण्यात आला आहे. एएनआय या वृत्तसंस्थेने या बॅनरचा एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. समाजवादी पक्षाच्या कार्यालयाबाहेर सदर बॅनर लावलेले दिसत असून पक्षाचे प्रवक्ते फखरुल हसन चांद यांनी हे बॅनर लावले आहे. अशाचप्रकारचे बॅनर यावर्षी जुलै महिन्यात अखिलेश यादव यांना ५० व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी लावण्यात आले होते.**




बॅनर लावण्यामागे नेमका हेतू काय? असा प्रश्न एएनआय वृत्तसंस्थेने चांद यांना विचारला असता ते म्हणाले, “समाजवादी पक्षाचे नेते आणि सर्व कार्यकर्त्यांची ही इच्छा आहे की, अखिलेश यादव यांनी देशाचे पंतप्रधान बनावे. “नेताजींनी (दिवंगत नेते मुलायम सिंह यादव) देशाचे पंतप्रधान बनावे, असे आमचे स्वप्न होते. पण ते अपुरेच राहिले. त्यामुळे अखिलेश यांच्या रुपात आमचे हे स्वप्न पूर्ण होवो, अशी सर्वांची इच्छा आहे.” चांद पुढे म्हणाले की, इंडिया आघाडीने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी अद्याप पंतप्रधान पदासाठी उमेदवार घोषित केलेला नाही. समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे की, अखिलेश यादव यांना पंतप्रधान पदाचा उमेदवार जाहीर करण्यात यावे. भाजपाला पराभूत करण्याचा दावा कुणीही करू शकतो. मात्र हे करून दाखविण्याची धमक फक्त समाजवादी पक्षातच आहे. दरम्यान, भाजपाचे नेते आणि आणि उत्तर प्रदेशचे मंत्री दानिश आझाद अन्सारी यांनी “मुंगेरी लाल के हसीन सपने” अशी शेलकी प्रतिक्रिया देत चांद आणि समाजवादी पक्षाला टोला लगावला. “आपण दिवास्वप्न पाहण्यापासून आपण कुणालाही रोखू शकत नाही, पण प्रत्येकाने आपल्या क्षमता तपासल्या पाहीजेत. ज्याच्यात क्षमता आहे, तोच या पदावर पोहचू शकतो”, अशी कोपरखळीही त्यांनी दिली. “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपल्या देशाने विकासाच्या दिशेने मार्गक्रमण केले आहे. देशातील लोकांचा मोदींवर विश्वास आहे आणि देशातील जनता तिसऱ्यांदा त्यांनाच देशाचे पंतप्रधान म्हणून निवडेल”, असा विश्वास अन्सारी यांनी एएनआयशी बोलताना व्यक्त केला. इंडिया आघाडीतील घटकपक्ष काँग्रेस आणि समाजवादी पक्षात अलीकडे वाद निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा बॅनरचा नवा वाद समोर आला आहे. मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जागा वाटपाची चर्चा करण्यात काँग्रेस पक्षाने उशीर केल्याबाबत यादव यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. यादव असेही म्हणाले की, इंडिया आघाडीपेक्षाही आमचे अधिक लक्ष पीडीए म्हणजे “पिछडा (मागासवर्गीय), दलित आणि अल्पसंख्याक” यांच्याकडे आहे. “फक्त बॅनर लावून कुणी देशाचा पंतप्रधान होत नाही. जर एखाद्या पदाधिकारी किंवा समर्थकाने असे बॅनर लावले असेल तर त्याने फक्त त्याच्या मनातली इच्छा व्यक्त केली आहे. समाजवादी पक्षाचा मुख्य हेतू भाजपाला रोखणे एवढाच आहे”, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी एएनआयशी बोलताना दिली. अखिलेश यादव यांनी शनिवारी काँग्रेसला इशारा देताना म्हटले की, काँग्रेसने समाजवादी पक्षाचा विश्वासघात करू नये आणि आघाडी करणार की नाही याबाबतची स्पष्ट भूमिका मांडावी. “काँग्रेस पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याकडून मला निरोप मिळाला आहे. जर त्यांच्याकडून काही पर्याय आले, तर त्याचा मी नक्कीच विचार करेन. पण त्यांना जर आमच्याशी आघाडी नको असेल, तर आमच्याशी ते संपर्क का साधत आहेत?” अशी प्रतिक्रिया देत असताना अखिलेश यादव यांनी काँग्रेस नेत्याचे आणि दिलेल्या निरोपाची मात्र वाच्यता केली नाही. भाजपाचे प्रवक्ते अवनीश त्यागी याविषयी प्रतिक्रिया देताना म्हणाले, “उत्तर प्रदेशच्या लोकांनी अखिलेश यादव यांना सपशेल नाकारले आहे. त्यांच्या पक्षाला इतर राज्यातही फारसा पाठिंबा नाही. त्यांचे सहकारी पक्षही त्यांच्यापासून अंतर ठेवण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितीतही जर ते पंतप्रधान पदाचे बॅनर लावत असतील तर ते ‘मुंगेरी लाल के हसीन सपने’ याशिवाय दुसरे काही असू शकत नाही.”

### भाजपाकडून सपाला चिमटा

भाजपाचे नेते आणि आणि उत्तर प्रदेशचे मंत्री दानिश आझाद अन्सारी यांनी “मुंगेरी लाल के हसीन सपने” अशी शेलकी प्रतिक्रिया देत चांद आणि समाजवादी पक्षाला टोला लगावला. “आपण दिवास्वप्न पाहण्यापासून आपण कुणालाही रोखू शकत नाही, पण प्रत्येकाने आपल्या क्षमता तपासल्या पाहीजेत. ज्याच्यात क्षमता आहे, तोच या पदावर पोहचू शकतो”, अशी कोपरखळीही त्यांनी दिली. “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपल्या देशाने विकासाच्या दिशेने मार्गक्रमण केले आहे. देशातील लोकांचा मोदींवर विश्वास आहे आणि देशातील जनता तिसऱ्यांदा त्यांनाच देशाचे पंतप्रधान म्हणून निवडेल”, असा विश्वास अन्सारी यांनी एएनआयशी बोलताना व्यक्त केला.

# निर्यातीतून मिळणारा ५० टक्के नफा शेतकऱ्यांना!

## 2027 पर्यंत शेतकऱ्यांची ही संख्या दोन कोटी पर्यंत पोहोचेल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेडला (एनसीईएल) आतापर्यंत ७००० कोटी रुपयांच्या ऑर्डर मिळाल्या आहेत. निर्यातीतून मिळणारा ५० टक्के नफा शेतकऱ्यांना आणि सहकारी संस्थांना दिला जाईल, असे प्रतिपादन गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी आज केले.**




नैसर्गिक शेतीच्या प्रोत्साहनाचा दाखला देताना अमित शाह यांनी सांगितले, की आतापर्यंत १२ लाख शेतकरी नैसर्गिक शेती करत आहेत. २०२७ पर्यंत शेतकऱ्यांची ही संख्या दोन कोटी पर्यंत पोहोचेल. सहकारी क्षेत्राकडून होणाऱ्या निर्यातीबाबत राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेड (एनसीईएल) द्वारे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत बोलताना गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी हे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सहकार निर्यात लिमिटेडच्या स्थापनेमागे सहकारी क्षेत्राची निर्यात वाढविणे आणि शेतकऱ्यांची समृद्धी वाढविणे हे उद्दीष्ट आहे, असे सहकार मंत्री म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रीय सहकार निर्यात लिमिटेडचा लोगो, संकेतस्थळ आणि माहिती पुस्तिकेचे प्रकाशन त्यांच्याहस्ते झाले. तसेच सदस्यता प्रमाणपत्रांचेही वितरण झाले. वाणिज्य मंत्री पीयुष गोयल हे देखील यावेळी उपस्थित होते. सहकार मंत्री अमित शाह म्हणाले, की राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेडची स्थापना निर्यात वाढविणे, शेतकऱ्यांना समृद्ध बनविणे, पीकपद्धतीमध्ये बदल घडविणे, सेंद्रीय उत्पादनांसाठी वैश्विक बाजारपेठ उपलब्ध करणे, जैवइंधनाच्या बाजारपेठेत भारताचा प्रवेश करणे तसेच सहकार क्षेत्राला बळकट करणे यासाठी झाली आहे.

### ग्रामीण भागाच्या विकासालाही हातभार

सध्या शेतकऱ्यांना गहू, साखर किंवा दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीतून मिळणारा लाभ कमी आहे. मल्टी स्टेट को-ऑप बीज सोसाइटी, मल्टी स्टेट को-ऑप ऑर्गेनिक सोसाइटी आणि मल्टी स्टेट को-ऑप एक्सपोर्ट सोसाइटी या पंतप्रधान मोदींनी बनविलेल्या तीन सहकारी संस्था आपले स्थान बळकट करतील आणि वैश्विक बाजारपेठेत दमदारपणे उभ्या राहतील, अशी ग्वाही देखील अमित शाह यांनी दिली. तर, एनसीईएल मुळे निर्यातीला चालना मिळेल तसेच ग्रामीण भागाच्या विकासालाही हातभार लागेल.

# सांस्कृतिक परंपरेचा खजिना म्हणजे दसरा..!

**हिंदूंचा एक प्रमुख सण आणि शुभ दिवस. आश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी किंवा दसरा म्हणतात. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत देवीचे नवरात्र असते. याची समाप्ती या दिवशी होते. शुंभ, निशुंभ, रक्तबीज, महिषासूर या राक्षसांना मारण्यासाठी दुर्गेने चंडीचा अवतार घेतला आणि नऊ दिवस या राक्षसांबरोबर युद्ध केले.**

दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' असं म्हणत विजयादशमीचा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवरात्राचा शेवटचा दिवस म्हणजे दसरा. ९ दिवस अधिष्ठान केलेल्या देवीने महिषासूर राक्षसाचा या दिवशी वध केला, असे म्हटले जाते. तसेच रामानेही याच दिवशी रावणाचा वध केल्याने या सणाला विजयादशमी असेही म्हटले जाते. रावणाचे दहन म्हणजेच वाईट वृत्तींचे दहन या दिवशी करावे, असे मानले जाते. या दिवशी घरोघरी पूजा-अर्चा करुन शस्त्रांची, लक्ष्मीची आणि घरातील वाहनांची मनोभावे पूजा केली जाते. झेंडूची फुले आणि आंब्याची पाने यांना आजच्या दिवशी विशेष महत्त्व आहे. दाराला झेंडूच्या फुलांचे तोरण बांधले जाते. तसेच आपट्याची पाने सोने म्हणून लुटणे ही पूर्वांपार चालत आलेली परंपरा आहे. वाचकहो, एकमेकांना ही आपट्याची पाने देऊन तुमच्या कुटुंबात भरभराट होवो. आपण आमच्यासाठी लाख मोलाचे आहात. म्हणून 'सोनं घ्या आणि सोन्यासारखे राहा'! दसऱ्याच्या दिवशी गावाच्या सीमा ओलांडून जाण्याची प्रथा प्रचलित आहे . लोक या दिवशी परस्परांनासोने म्हणून आपट्याची पाने देतात. सायंकाळी गावाची सीमा ओलांडून ईशान्येस जायचे, शमीच्या किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करायची, तेथे अष्टदल रेखाटून त्यावर अपराजिता देवीची स्थापना करावयाची आणि तिला प्रार्थना करावयाची की, मला विजयी कर. त्यानंतर योद्ध्यांनी शस्त्र पूजन, व्यापाऱ्यांनी व्यापारासाठी प्रयाण व विद्यार्थ्यांनी सरस्वतीपूजन करायचे अशी प्रथा होती. मुले पाटीवर सरस्वतीचे प्रतीकात्मक चित्र काढून त्या पाटीची पूजा करतात. पुस्तकांची आणि वह्यांचीही पूजा होते. दशमीला महिषासुराचा तिने वध करून अंतिम विजय संपादन केला, म्हणून या दिवशी आनंदोत्सव साजरा करतात. आश्विन शुद्ध दशमीच्या दिवशी आकाशात तारका दिसू लागताच विजय नावाचा मुहूर्त असतो व त्यावेळी जे काम हाती घ्यावे त्यात यश मिळते, असे पुराणात सांगितले आहे. चैत्र पाडवा (चैत्र शुद्ध प्रतिपदा), अक्षय्य तृतीया (वैशाख शुद्ध तृतीया), विजयादशमी व दिवाळीचा पाडवा (कार्तिक शुद्ध प्रतिपदा, अर्धा मुहूर्त) या हिंदूंच्या साडेतीन विशेष शुभ मुहूर्तातील हा एक आहे. विजयादशमीला 'दसरा' असे म्हटले जाते. याच दिवशी रामाने रावणाचा वधही केला होता असे म्हणतात. रावणाचे दहन केले म्हणूनच वाईट वृत्तींचे दहन या दिवशी करावे असे मानले जाते. दसऱ्याच्या दिवसाला सीमोल्लंघन म्हणूनही ओळखले जाते. कारण अनेक शूर, पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राज्यावर स्वारी करण्यास जात असत, त्याला सीमोल्लंघन म्हणत. म्हणून हा दिवस सीमोल्लंघन म्हणून ओळखला जातो. आपल्या गावाची वेस ओलांडून जाणे याचा अर्थ सीमेचे उल्लंघन करणे. या दिवशी शमी किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करतात. शमी वृक्षाजवळच भूमीवर अपराजिता देवीची मूर्ती रेखाटून तिचीही पूजा करतात. रावणाचा वध करण्यासाठी रामाने याच दिवशी शमीचे पूजन करून प्रस्थान ठेवले. अर्जुनाने अज्ञातवास संपवून याच दिवशी शमीचे पूजन केले व आपली शस्त्रे पुन्हा हातात घेतली. पुर्वीच्या काळी दसऱ्याच्या दिवशी विजयोत्सव असल्याने राजे महाराजे आपल्या घोड्यांना सुशोभित अलंकार घालत असतं नंतर निराजन नावाचा विधी करत, शस्त्रास्त्रांचे पूजन करत आणि मग पुढच्या लढाईत विजय मिळवण्यासाठी प्रस्थान करत असे सांगितले जाते. कौत्सासाने चौदा कोटी सुवर्णमुद्रा देण्यासाठी रघुराजाने कुबेरावर स्वारी केली. त्यामुळे भयग्रस्त होऊन कुबेराने दसऱ्याच्या दिवशी शमीच्या झाडावर सुवर्णवृष्टी केली.आवश्यक तेवढे सोने रघुराजाने कौत्सास देऊन बाकीचे त्याने नागरिकांना वाटले अशी कथा स्कंदपुराणात आहे. या दिवशी सोने लुटण्याच्या प्रथेचा संबंध याच कथेशी आहे. साधारणपणे त्रेतायुगापासुन साजरा केला जाणारा विजयादशमी म्हणजेच दसरा हा सण असून, या सणाला हिंदू धर्ममध्ये अनन्य साधारण महत्त्व आहे. आश्विन शुद्ध दशमी म्हणजेच विजयादशमी. असे म्हणतात की, याच दिवशी भगवान रामाचा पूर्वज रघू या



आयोध्याधीश राजाने विश्वजित यज्ञ केला होता. त्या काळापासून म्हणजे त्रेतायुगापासून हिंदू लोक विजयादशमी महोत्सव साजरा करतात. दसऱ्याला शमी वृक्ष पूजनाला विशेष महत्त्व आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसात प्रत्येक दिवशी संध्याकाळी शमी वृक्षपूजन केल्याने आरोग्य व धन संपत्ती प्राप्त होते अशी मान्यता आहे. या वृक्षाला अश्मंतक असेही म्हणतात. आपट्याची पाने पित्त व कफ दोषांवर गुणकारी आहेत. विजयादशमीला आपट्यांची पाने एकमेकांना दिली जातात. यालाच सोने लुटणे असेही म्हणतात. 'दसरा' हा प्रारंभी एक कृषीविषयक लोकोत्सव होता. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यावेळी शेतकरी हा उत्सव साजरा करत असत. विजयादशमीला शस्त्र आणि शास्त्र पूजन करण्याविषयी वेगवेगळे महत्त्व आहे. प्राचीन काळापासून क्षत्रिय युद्धाला जाण्यासाठी या दसरा या दिवसाची निवड करत होते. त्यांचे मानणे होते की, दसर्यासच्या असे दिवशी केलेल्या युद्धात निश्चितच विजय मिळतो. दसरा या दिवशी क्षत्रियांप्रमाणे ब्राह्मण लोकही विद्या ग्रहण करण्यासाठी घराबाहेर पडत. तसेच व्यापारी लोक विजयादशमीच्या या पवित्र दिवशी नवीन दुकान, शोरूम इत्यादींचा शुभारंभ करणे शुभ मानतात. नवरात्र स्पेशल घरच्या घरी तयार करा बीटाचा हलवा नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखालच्या ताटात नऊ धान्यांची पेरणी करतात व दसर्याच्या दिवशी त्या धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात. कित्येक ठिकाणी शेतातल्या भाताच्या लोंब्या तोडून आणून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. ही प्रथादेखील या सणाचे कृषीविषयक स्वरूपच व्यक्त करते. पुढे याच सणाला धार्मिक स्वरूप दिले गेले आणि इतिहासकाळात तो एक राजकीय स्वरूपाचा सण ठरला.



# पाकिस्तानचे 'वस्त्रहरण'!

## » अफगाणिस्तानकडून पाकिस्तानाला धोबीपछाड

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**अफगाणिस्तानने पाकिस्तानचे 'वस्त्रहरण' करून वनडे विश्वचषकातील दुसऱ्या सनसनाटी विजयाची नोंद केली. यंदाच्या विश्वचषकातला हा तिसरा उलटफेर ठरला आहे. बंगळूरुच्या एम चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात पाकने अफगाणिस्तानपुढे विजयासाठी 283 धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे अफगाण संघाने आपल्या चिवट फलंदाजीच्या जोरावर पार केले आणि 8 विकेट्स राखून सामना खिशात घातला.**

इब्राहिम झद्रान (87 धावा), रहमानउल्ला गुरबाज (65), रहमत शाह (नाबाद 77), हशमतुल्ला शाहिदी (नाबाद 48) हे अफगाणिस्तानच्या या रोमहर्षक विजयाचे हिरो ठरले. या विजयासह अफगाणिस्ताने इतिहास रचला आहे. एकदिवसीय क्रिकेटमध्ये अफगाणिस्तान संघाने पाकिस्तानचा पराभव करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या सामन्यापूर्वी दोघांमध्ये 7 सामने खेळले गेले होते आणि सर्व सामन्यांत पाकने बाजी मारली होती. 283 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या अफगाणिस्तान संघाला सलामीवीर झद्रान आणि गुरबाज यांनी धमाकेदार सुरुवात केली. दोघांनी पाक गोलंदाजांवर एकापाठोपाठ आक्रमण चढवले. या दोघांनी पॉवरप्लेच्या 10 षटकांत 60 धावा केल्या.

शाहीनच्या पहिल्याच षटकात 10 धावा वसूल केल्या. त्यानंतर दुसऱ्या षटकात 8, तिसऱ्या- चौथ्या-पाचव्या आणि सहाव्या षटकात एकूण 16 जमा केल्या. सहाव्या षटकात पंचांनी झद्रानला बाद घोषित केले. अशा परिस्थितीत डीआरएसने त्याला वाचवले. जीवदान मिळाल्यानंतर आठव्या षटकात झद्रानने गुरबाजसह हरिस



रौफच्या एका षटकात 17 धावा चोपल्या. या दोघांनी हरिसच्या एका षटकात चार चौकार मारले. 283 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या अफगाणिस्तान संघाला सलामीवीर झद्रान आणि गुरबाज यांनी धमाकेदार सुरुवात केली. दोघांनी पाक गोलंदाजांवर एकापाठोपाठ आक्रमण चढवले. या दोघांनी पॉवरप्लेच्या 10 षटकांत 60 धावा केल्या. शाहीनच्या पहिल्याच षटकात 10 धावा वसूल केल्या.

त्यानंतर दुसऱ्या षटकात 8, तिसऱ्या- चौथ्या-पाचव्या आणि सहाव्या षटकात एकूण 16 जमा केल्या. सहाव्या षटकात पंचांनी झद्रानला बाद घोषित केले. अशा परिस्थितीत डीआरएसने त्याला वाचवले. जीवदान मिळाल्यानंतर आठव्या षटकात झद्रानने गुरबाजसह हरिस रौफच्या एका षटकात 17 धावा चोपल्या. या दोघांनी हरिसच्या एका षटकात चार चौकार मारले. हीच फटकेबाजीची लय दोघांनी काय ठेवली आणि पहिल्या विकेटसाठी 130 धावांची भागिदारी रचली. अफगाणिस्तानची पहिली विकेट 130 धावांवर पडली. शाहीन आफ्रिदीने रहमानउल्ला गुरबाजला बाद केले. गुरबाजने 53 चेंडूत 65 धावा केल्या. ओसामा मीरने त्याचा झेल घेतला. त्यानंतर मैदानात उतरलेल्या रहमत शाहने आणि इब्राहिम झद्रानला खंबीर साथ दिली. दोघांनी अर्धशतकी भागीदारी रचली. झद्रान त्याच्या शतकाच्या जवळ पोहचला होता पण 13 धावांनी त्याला हुलकावणी मिळाली. तो 87 धावांवर बाद झाला. 190 धावांवर अफगाणिस्तानची दुसरी विकेट पडली. हसन अलीने झद्रानला मोहम्मद रिझवानकरवी झेलबाद केले. कर्णधार हशमतुल्लाह शहीदी मैदानात उतरला. त्याने शाह सोबत संयमी खेळी केली. ज्यामुळे अफगाणिस्तानच्या धावसंख्येने दोन गडी गमावून 200 धावा पार केल्या. दोघांनी चांगली भागीदारी करून संघाला हळूहळू लक्ष्याच्या जवळ नेले आणि आणि अखेर 49 व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर शहीदीने चौकार मारून विजयावर शिक्कामोर्तब केला.

### बाबरची 74 धावांची महत्त्वपूर्ण खेळी

» 34 व्या षटकामध्ये 163 धावांवर पाकिस्तानला चौथा धक्का बसला. नबीच्या गोलंदाजीवर शकीलने रशीद खानकडे झेल दिला. त्याने 34 चेंडूमध्ये 25 धावा केल्या धावांमध्ये केल्या. 36 व्या षटकात कर्णधार बाबर आझमने आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने 69 चेंडूत 4 चौकाराच्या मदतीने आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर बाबर आझमने पाकिस्तानचा डाव सावरला. पाकिस्ताने 200 धावांचा टप्पा पूर्ण केला. मात्र 42 व्या षटकात नूर अमदने नबी करवी बाबरला बाद केले. त्याने 92 चेंडूत 74 धावांची खेळी केली. यामध्ये 4 चौकार तर 1 षटकाराचा समावेश होता.

# झाम्पाने दिली ताजमहालला भेट!

## » ताजमहालची कारागिरी पाहून आश्चर्य व्यक्त

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकदिलवसीय विश्वचषक २०२३ स्पर्धेचे यजमानपद भारताकडे आहे. या स्पर्धेत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहिला मिळत आहे. विश्वचषक स्पर्धेचे आयोजन देशातील वेगवेगळ्या सुंदर शहरात केले जात आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा स्टार फिरकी गोलंदाज ॲडम झाम्पाने आग्रा येथे पोहोचला आहे, जिथे त्याने ताजमहाल पाहिला आणि त्याच्या कुटुंबासोबत फोटोही काढले. ताजमहाल पाहिल्यानंतर त्याला खूप आनंद झाला आणि ताजमहालची कारागिरी पाहून आश्चर्य व्यक्त केले.**



तो म्हणाला की, मशीनशिवाय अशी रचना करणे खरोखर आश्चर्यकारक आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ॲडम झाम्पाने पत्नी, आई आणि मुलासोबत आग्रा येथील ताजमहालला भेट दिली. भारतीय वेळेनुसार पहाटे ५.४५ वाजता ते आग्रा येथे पोहोचले. तथापि, ॲडम झाम्पा मुख्य थडग्यावरील लांबलचक रांगेमुळे वर जाऊ शकला नाही. म्हणूनच त्याने चमेली मजल्यावरूनच सुंदर इमारतीकडे पाहिले. यावेळी गाईडशी बोलताना ॲडम झाम्पा खूप उत्साही दिसला. ॲडम झाम्पा म्हणाला की, ऑस्ट्रेलिया नेहमीच अव्वल असतो, पण यावेळी भारतीय खेळपट्ट्या थोड्या वेगळ्या आहेत. भारतीय संघाच्या कामगिरीबद्दल ॲडम झाम्पा म्हणाला की, भारतीय संघ विश्वचषकात चांगली कामगिरी करत आहे.

रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या उपस्थित भारतीय संघाला हरवणे कठीण आहे. ॲडम झाम्पाने बॅटरी कारबाबत शिल्पग्राममध्ये नाराजी व्यक्त केली. बॅटरी कारमध्ये त्यांचा बसण्याचा क्रमांक होता, मात्र इतर पर्यटक त्यात बसले. यावर ॲडम झाम्पा संतापला आणि म्हणाला बॅटरी कारचा अभाव पर्यटकांसाठी अडचणीचा ठरत आहे. २०२३ च्या विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली नसेल, पण संघाने अप्रतिम पुनरागमन केले आहे. त्याचबरोबर सध्या गुणतालिकेत ४ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. हा संघ आपला पुढचा सामना २५ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर नेदरलँड्सविरुद्ध खेळणार आहे. त्या सामन्यात कांगारू संघाचा वरचष्मा असणार आहे. कारण ते दोन सामने जिंकून परत येत आहे आणि ऑस्ट्रेलिया हा नेदरलँड्सपेक्षा बलाढ्य संघ आहे.

# आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताचा डबल धमाका!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

चीनच्या हांगझोऊ येथे सुरू असलेल्या चौथ्या आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताने आपल्या मोहिमेची धमाकेदार सुरुवात केली. सोमवारी (दि. 23) भारतीय खेळाडूंनी सहा सुवर्ण, सहा रौप्य आणि पाच कांस्य पदकांसह 17 पदके जिंकली आहेत. प्राची यादवने भारताला पहिले पदक मिळवून दिले. तिने कॅनोई VL2 स्पर्धेत रौप्य पदकावर आपले नाव कोरले. त्यानंतर भारतीय खेळाडूंनी पदकांचा पाऊस पडला. कपिल परमारने ज्युडोमध्ये पुरुषांच्या 60 किलो J1 मध्ये रौप्यपदक तर कोकिलाने ज्युडो महिला 48 किलो J2 स्पर्धेत तैपेईच्या ली काई-लिनचा पराभव करून कांस्यपदक जिंकले. आशियाई पॅरा गेम्स 2023 मध्ये भारताने पदक जिंकण्याचा सिलसिला कायम ठेवला आहे. अरुणा तन्वरने महिलांच्या तायक्वांदो K44-47 किलो गटात कांस्यपदक जिंकले. या क्रीडा प्रकारात पदक जिंकणारी ती पहिली भारतीय खेळाडू बनली आहे. तिने निकराच्या लढतीत चिनी प्रतिस्पर्धी चेन टोंगचा 13-12 असा पराभव करून पदकावर मोहोर उमटवली. भारताच्या प्रवीण कुमारने सोमवारी चीनमधील हांगझोऊ येथे सुरू असलेल्या आशियाई पॅरा गेम्स 2023 मध्ये पुरुषांच्या उंच उडी-T64 स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. त्याने 2.02 मीटर उंच उडी मारून आपल्या नावावर विक्रम नोंदवला. दरम्यान, उन्नी रेणूने 1.95 मीटरच्या सर्वोत्तम उडीसह कांस्यपदक जिंकले. प्रणव सुरमाने ॲथलेटिक्स स्पर्धेत पुरुषांच्या क्लब थ्रो एफ51 स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले.